# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**



**अंक ३/२०१९** **दिनांक ०८/०१/२०१९** **कालावधी ५ दिवस**



| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२/०१/२०१९ ते ०८/०१/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून १३/०१/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/०१ | ०३/०१ | ०४/०१ | ०५/०१ | ०६/०१ | ०७/०१ | ०८/०१ | | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.६ | ३२.२ | ३१.२ | ३१.० | ३०.६ | ३०.६ | ३१.० | कमाल तापमान (अं.से) | २९ | २८ | २७ | २७ | २७ |
| १२.६ | १५.० | ११.८ | ११.८ | १२.६ | १५.८ | १२.२ | किमान तापमान (अं.से) | १६ | १५ | १५ | १६ | १६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | ३ |
| ८१ | ६० | ९१ | ९० | ६६ | ६८ | ७४ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ६५ | ६६ | ६६ | ६६ |
| ३१ | ३२ | ४९ | ४१ | ४८ | ३३ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३१ | ३३ | ३३ | ३५ | ३५ |
| १.७ | ३.२ | १.८ | १.६ | २.० | ५.३ | ४.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ८ | ५ | ४ | ६ |
| द. | नै. | शांत | शांत | द. | द. | पू. | वाऱ्याची दिशा | ई. | ई.पू. | पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ९ ते १३ जानेवारी २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात साधारण राहील तसेच आद्रता कमी होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोप अवस्था | • उन्हाळी भात रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| वाल | फुलोरा अवस्था | • कमी होणारी आद्रता तसेच पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्याच्या काळात व शेंगा भरताना पाणी व्यवस्थापन करावे.<br>• वाल पिकामध्ये शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व गरजेनुसार ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| आंबा | पालवी आणि बोंगे फुटण्याची अवस्था | • आंबा पिकामध्ये बोंगे फुटण्याच्या अवस्थेत तुडतुडयाच्या नियंत्रणासाठी प्रवाही लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून झाडाच्या खोडावर, फांद्यावर व पानांवर बसेल अशारीतीने संपूर्ण झाडावर फवारणी करावी. तसेच भुरी रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या फवारणीच्या द्रावणामध्ये ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात मिसळावे. |
| फुलपिके | फुलोरा अवस्था | • काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी सकाळच्या वेळी करून घ्यावी.<br>• ॲस्टर पिकावर पाने खाणाऱ्या व कळ्या पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | वाढीची अवस्था | • टोमॅटो, वांगी, पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडग्रस्त फांद्या व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी करून घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**